प्रेस नोट दिनांक - १९/०८/२०१९

**युनिट - ३ गुन्हे शाखा पुणे ची कामगिरी - सराईत गुन्हेगारांकडुन घरफोडी चोरीचे सत्तावीस गुन्हे उघड तेवीस लाख सत्तावीस हजाराचा ऐवज हस्तगत**

मा. डॉ के. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंन्द्र शिसवे पोलीस सह आयुक्त पुणे यांनी यांनी पुणे शहरा मध्ये घरफोडी व इतर चोरीचे गुन्हे घडु नये व मालमत्तेच्या गुन्हयांना प्रतिबंध व्हावा यासाठी पोलीस अभिलेखावरील गुन्हेगारांचे हालचालीवर नजर ठेवुन त्यांचा शोध घेवुन त्यांचेविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी यांना वेळोवेळी आदेश दिलेले आहेत तसेच क्रिप्स सारख्या योजना राबविल्या जात आहेत.

गुन्हे शाखा युनिट-३ पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे पोलीस अभिलेखावरील गुन्हेगारांची माहीती काढुन त्यांना चेक करत असताना दिनांक - १४/०७/२०१९ रोजी पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर व अतुल साठे यांना त्यांचे खब-याकडुन मिळालेल्या बातमीवरुन रामटेकडी हडपसर परिसरात सापळा लावुन पोलीस अभिलेखावरील घरफोडी चो-या करणारे गुन्हेगार १) जितसिंग ऊर्फ जितु राजपालसिंग टाक वय-२३ रा-वैदवाडी बिराजदार नगर खोली नं-५ पुणे २) हुकुमसिंग रामसिंग कल्याणी वय-२८ वर्षे रा-कोठारी शोरुमचे बाजूला रामटेकडी हडपसर पुणे ३) अंगतसिंग अजमेरसिंग कल्याणी वय-३४ वर्षे रा-कोठारी शोरुमचे बाजूला रामटेकडी हडपसर पुणे यांना ताब्यात घेण्यात आले आहे . यांचेकडे सखोल तपास केला असता त्यांनी त्यांचे साथीदार लखनसिंग रजपुतसिंग दुधाणी यांचेसह पुणे शहरामध्ये मागील दीड वर्षापासुन घरफोडी चो-या करत असल्याचे सांगीतले आहे. श्री. विनायक प्रमोद खाडे रा-प्रसन्न श्री अपार्टमेंट आयडीयल कॉलनी कोथरुड पुणे यांचे घर बंद असताना रात्रीच्या वेळेस आरोपींनी दरवाज्याचे कोयंडा कापुन घरात प्रवेश करुन सोने चांदीचे दागिने चोरल्याचे उघडकीस आले आहे.

आरोपींकडुन आतापर्यंत **एकुण ४७० ग्रॅम (४७ तोळे) वजनाचे सोन्याचे व ४०८० ग्रॅम (४ किलो) वजनाचे चांदीचे दागिने, एक कार, एक मोटार सायकल, गुन्हा करण्यासाठी वापरलेली हत्यारे दोन कटावणी, एक बोल्ट कटर, दोन स्क्रु ड्रायव्हर असा एकुण तेवीस लाख सत्तावीस हजार रुपयाचा ऐवज हस्तगत करण्यात आलेला आहे.** आरोपींनी पुणे शहरातील वेगवेगळया भागातील सोसायटयामधील बंद घर फोडुन घरफोडया केल्या आहेत. **त्यांचेकडुन पुढीलप्रमाणे पोलीस स्टेशन कडील गुन्हे उघडकीस आलेले आहे. कोथरुड - १२ , सिंहगड रोड - ५ , वारजे - ३ , भारतीय विदयापीठ - १ दत्तवाडी - १ मुंढवा - २ व डेक्कन - १ हवेली - १ स्वारगेट - १ असे एकुण - २७ दाखल गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले आहेत.** आरोपींकडुन पुणे शहर व परिसरात घरफोडी चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. त्याबाबत पोलीस तपास करत आहेत. मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो न्यायालय क्रमांक - १ पुणे यांचे न्यायालयात आरोपींना हजर केले असता त्यांना दिनांक - २२/०८/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहे.

आरोपी वरहापालन व लोखंडी हत्यारे बनविण्याचा व्यवसाय वरकरणी करतात आरोपी जितसिंग टाक याचे विरुध्द डेक्कन व हडपसर पो स्टे येथे ४ घरफोडी व इतर चोरीचे २ असे एकुण सहा गुन्हे दाखल आहे. हुकुमसिंग याचे विरुध्द घरफोडी, इतर चोरी व खुनाचा प्रयत्न प्रत्येकी एक याप्रमाणे तीन गुन्हे दाखल आहे. यातील फरार आरोपीनामे लखनसिंग रजपुतसिंग दुधाणी याचेवर यापुर्वीचे ९ घरफोडी २ चोरी असे एकुण ९ गुन्हे दाखल आहेत. जितसिंग हा आरोपी दहावीपर्यंत शिक्षण झालेला आहे. इतर तीन आरोपींचे चौथी ते पाचवी पर्यंत शिक्षण झालेले आहे.

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. बच्चन सिंग, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे पुणे डॉ. शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, किरण अडागळे, राजकुमार केंन्द्रे व गुन्हे युनिट ३ पथकातील पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर, प्रविण तापकीर, संदीप तळेकर, अतुल साठे, अनिल शिंदे, संदीप राठोड, रोहीदास लवांडे, शकील शेख, राहुल घाडगे, दत्तात्रय गरुड, दिपक मते, किशोर शिंदे, रामदास गोणते, सचिन गायकवाड, गजानन गानबोटे, कैलास साळूंखे, कल्पेश बनसोडे, विल्सन डिसोझा, नितीन रावळ यांनी केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंन्द्र मोकाशी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड हे पुढील तपास करत आहेत.

(राजेंन्द्र मोकाशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे


युनिट ३, गुन्हे शाखा, पुणे शहर


पुणे शहर पोलीस आयुक्तालय